चंद्रपूरच्या क्रीडा वैभवाला मिळणार नवी झेप; वीर बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाच्या १३७ कोटींच्या प्रस्तावाला गती!

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे निवेदन; प्रशासकीय मान्यतेसाठी लवकरच विशेष बैठक आयोजित होणार

आ.मुनगंटीवार यांचा ग्रामीण व आदिवासी भागातील गुणवंत खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा ध्यास

चंद्रपूर - क्रीडा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून युवकांच्या सामर्थ्याला दिशा देणारे, शिस्त आणि जिद्दीची रुजवण करणारे तसेच जिल्ह्याची ओळख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणारे प्रभावी माध्यम आहे, या ठाम भूमिकेतून आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरच्या क्रीडा विकासासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. याच क्रीडाध्यासातून मौजा दाताळा येथे १३७ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक वीर बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाच्या प्रस्तावाला गती मिळावी, यासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी भेट घेऊन निवेदन सादर केले. या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री महोदयांनी विशेष बैठक आयोजित करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले असून, लवकरच यासंदर्भात बैठक होणार आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत मौजा दाताळा येथे वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने साकारण्यात येणाऱ्या भव्य क्रीडा संकुलासाठी १६ एकर जागा आरक्षित करण्यात आली आहे. चंद्रपूरच्या क्रीडा क्षेत्राला नवी उंची देणारा हा महत्त्वपूर्ण निर्णय असून, स्थानिक खेळाडूंच्या कौशल्याला हक्काचे व्यासपीठ आणि भावी पिढीच्या क्रीडा स्वप्नांना भक्कम आधार देणारा ठरणार आहे. आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान केवळ संकल्पना आणि घोषणांपुरते मर्यादित नसून, जिल्ह्यात उभारलेली क्रीडा संकुले, स्टेडियम आणि विविध क्रीडा सुविधांमधून त्यांच्या क्रीडाप्रेमाची

आणि विकासदृष्टीची साक्ष मिळते. खेळाडूंना दर्जेदार सराव सुविधा, स्पर्धांसाठी सक्षम व्यासपीठ आणि आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविण्याची संधी मिळावी, यासाठी त्यांनी सातत्याने क्रीडा पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य दिले आहे.

याच क्रीडादृष्टीचा आणखी एक प्रेरणादायी आविष्कार म्हणजे 'मिशन शौर्य' या मोहिमेच्या माध्यमातून १७ ते १८ वयोगटातील आदिवासी युवकांमधील असामान्य जिद्द, साहस आणि सुप्त सामर्थ्याला जागतिक व्यासपीठ मिळाले. या मोहिमेतील पाच आदिवासी युवकांनी जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर करून इतिहास घडविला. त्यांच्या या अतुलनीय कामगिरीचा गौरव देशाचे पंतप्रधान युगपुरुष नरेंद्रजी मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात विशेष उल्लेखाने केला. क्रीडा सुविधा उभारून खेळाडू घडविणे आणि दुर्गम भागातील आदिवासी युवकांच्या स्वप्नांना थेट एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत झेप घेण्याचे बळ देणे, या दोन्ही आघाड्यांवरील आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे कार्य त्यांच्या दूरदृष्टीची, क्रीडाप्रेमाची आणि युवा सामर्थ्यावरील अढळ विश्वासाची प्रचीती देणारे आहे.

'मिशन ऑलिंपिक २०३६'च्या ध्येयाने चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी मुलांना क्रीडा प्रशिक्षण देण्याचे कामही सुरू आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील युवकांमध्ये प्रचंड क्रीडाक्षमता असून त्यांना योग्य प्रशिक्षण, आधुनिक सुविधा आणि संधीचे व्यासपीठ मिळाल्यास ते राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, असा विश्वास आमदार मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने साकारण्यात येणारे हे क्रीडा संकुल केवळ अत्याधुनिक क्रीडा सुविधांचे केंद्र न राहता, गोंडवाना भूमीचा गौरवशाली इतिहास, आदिवासी युवकांचे सामर्थ्य आणि भावी पिढीच्या स्वप्नांना नवी भरारी देणारे प्रेरणास्थान बनेल. चंद्रपूरसह संपूर्ण पूर्व विदर्भाच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख मिळवून देणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे खेळाडूंच्या गुणवत्तेला बळ देणारे आणि नव्या पिढीच्या क्रीडास्वप्नांना आकार देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

सुधीर मुनगंटीवार

माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

वंदे मातरम् १५०
वंदे मातरम् आपला मंत्र वंदे मातरम्

जा.क्र. 1373/ नोव्हेंबर 2026

०९.११.२०२६

प्रति,

मा. ना. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-३२

सप्रेम वंदेमातरम !!

विषय: चंद्रपूर जिल्ह्यातील मौजा दाताळा येथे अत्याधुनिक स्वातंत्र्यवीर स्वर्गीय बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाचे बांधकामाच्या रु. १३७ करोड अंदाजपत्रकीय रकमेच्या संदर्भात दिनांक १७, १८ व १९/११/२०२६ रोजी बैठकीचे आयोजन करणेबाबत.

संदर्भ:
१. माननीय जिल्हाधिकारी तथा उपाध्यक्ष जिल्हा क्रीडा संकुल समिती चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय
२. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चंद्रपूर यांचे अंदाजपत्रक सादर पत्र क्रमांक ४७८४/का २(४) / तांत्रिक/२०२४ दिनांक २०/०९/२०२४,
३. माननीय. मुख्यमंत्री मा.ना.श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब गांगा जा.प्रा.८३३४/ऑपटो/२०२५/ दिनांक २६/१०/२०२५ चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, नवीन चंद्रपूर येथे क्रीडा संकुल उभारणीकरिता नविन चंद्रपूर विकास योजनेतील सहाय्यक संचालक नगररचना विशेष नियोजन प्राधिकरण/म्हाडा, चंद्रपूर यांच्याकडून मौजा दाताळा ता. जि. चंद्रपूर येथील नवीन चंद्रपूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १५२ स्टेडियम कॉम्प्लेक्स या नावे आरक्षित असलेली १६ एकर जागा मंजूर करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. १ च्या बैठकीतील निर्णयानुसार सदर जागेवर अद्यावत क्रीडा सुविधा अंतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाचे बांधकाम करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, चंद्रपूर यांचेमार्फत रु. १३७ करोडचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर प्रस्ताव संदर्भ क्र. २च्या पत्रानुसार रु. १३७ करोडचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करण्यात आलेले होते. यापूर्वी वीर बाबुराव शेडमाके सभागृह प्रकल्पाकरिता राज्य शासनाकडून रु. २५ करोड उपलब्ध झालेले आहेत. तसेच महाकाली मंदिरासाठी रु. ६० करोड इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध झालेला आहे. या दोन्ही कामांचा प्राप्त झालेला रु. ८५ करोडचा निधी स्व. बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाकरिता वापरण्याची परवानगी व्हावी, अशी विनंती आहे. स्वर्गीय बाबुराव शेडमाके क्रीडा संकुलाचा १३७ करोडचा हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला उर्वरित निधी ५२ करोड रुपये जिल्ह्याच्या खनिज विकास प्रतिष्ठान अंतर्गत उपलब्ध करून देण्याचे मी अर्थमंत्री असताना निर्देश दिले होते.

पत्ता : भाग्यश्री गोल मारुती चौक, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com

सुधीर मुनगंटीवार
माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

वंदे मातरम् १५०
देश मंगलम् जगत मंगल वंदे मातरम्

वीर बाबूराव शेडमाके सभागृह व महाकाली मंदिर या दोन्ही विकास कामांना पुरातत्त्व विभागाकडून प्रखर विरोध असल्याने हा निधी दाताळा येथील अत्याधुनिक स्वर्गीय वीर बाबूराव शेडमाके क्रीडा संकुलाकरिता वापरण्याची परवानगी देण्याची विनंती आहे.

स्वातंत्र्यवीर स्वर्गीय वीर बाबुरावजी शेडमाके यांचे नावाने दाताळातील अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्याची जिल्ह्यातील सर्व आदिवासी संघटनांकडून एकत्रितपणे मागणी होत आहे. मिशन ओलंपिक २०३६ साठी जिल्ह्यातील आदिवासी मुलांचे प्रशिक्षण जिल्ह्यात सुरू असून मिशन शौर्य एव्हरेस्ट अंतर्गत माझ्या विधानसभेतील ०५ आदिवासी मुलांनी एव्हरेस्ट शिखर गाठले होते. या मुलांचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी १५ ऑगस्ट च्या आपल्या भाषणात लाल किल्ल्यावरून या मुलांचे विशेष कौतुक केले होते.

चंद्रपूर जिल्ह्यातील या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वीर बाबुराव शेडमाके क्रीडा संकुल स्मारकाची कल्पना पूर्णत्वास जाण्याकरिता व पूर्व विदर्भातील गोंडवाना प्रदेशातील मोठे स्मारक वीर बाबुराव शेडमाके नावाने आंतरराष्ट्रीय पातळीवर कीर्तिमान होण्याकरिता या प्रकल्पास मंजुरी मिळणे गरजेचे आहे.

यासंदर्भात मान्यतेसाठी आपली विशेष बैठक ही अतिमहत्वाची व अनिवार्य आहे. केवळ १८ महिन्यात हे काम पुर्णत्वास नेऊन आपले शुभहस्ते उद्घाटन करणे शक्य आहे.

आपणास विनंती आहे की, चंद्रपूर जिल्ह्यातील या अत्याधुनिक क्रीडा संकुलाच्या रु. १३७ करोडच्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याच्या संदर्भात आपल्या स्तरावरुन दिनांक १७, १८ व १९/११/२०२६ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात यावे व सदर बैठकीला संबंधित अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आदेश प्रदान करावे, ही विनंती.

बैठकीची रूपरेषा मला कळिवल्यास मी आपला आभारी राहील,

आपला,

योग्य सहकार्याची अपेक्षा.

सविनय धन्यवाद !

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत माहितीत सादर -
१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर
२. मा. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, चंद्रपूर
३. मा. कार्यकारी अभियंता, सा. बां विभाग ७. ५. बंद्रपूर

पत्ता : धान्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com